# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

परीक्षा गोदाम विभाग
गणेशखिंड, पुणे ४११००७
दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६२१४६०/६२
Website: www.unipune.ac.in

(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)
SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY
(Formerly University of Pune)

Exam Godown
Ganeshkhind Pune 411007.
Contact : 020-25621460/62
e-mail: godown@pun.unipune.ac.in


संदर्भ क्र. : पगो/२०२५/१६० दि. ०६.०१.२०२५

प्रति,
मा. प्राचार्य
सर्व संलग्नीत महाविद्यालये,

विषय : - उत्तरपत्रिका व प्रणालीमधील प्रश्नपत्रिकांच्या (**QPD**) हिशोबाची नोंदवहीत अद्ययावत माहिती ठेवणेबाबत.

महोदय,

आपणास विदीत आहे की, या विद्यापीठाच्या सर्व प्रश्नपत्रिका या संगणकीय प्रणालीद्वारे ठरलेल्या वेळापत्रकानुसार सर्व संबंधित परीक्षा केंद्रांना पाठविण्यात येतात. तसेच लेखी परीक्षेच्या उत्तरपत्रिका देखील प्रत्यक्षात महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्रांवर विद्यापीठामार्फत पोहोचविण्यात येतात. विविध महाविद्यालयांच्या परीक्षा केंद्रांवर भरारी पथके, परीक्षा केंद्र समिती सदस्य यांच्या निर्धारीत भेटी होत असतात. सदरच्या भेटी दरम्यान असे आढळून आले आहे की, प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका या किती प्राप्त झाल्या, त्यापैकी किती उत्तरपत्रिका/प्रश्नपत्रिका वापरल्या, काही खराब झाल्या असतील इत्यादी बाबतचा अचुक हिशोब व्यवस्थितपणे ठेवण्यात येत नाही. त्यामुळे विद्यापीठाकडून वरील हिशोबाच्या खालील दोन नोंदवह्या (**Register**) छापून सर्व महाविद्यालयांसाठी/परीक्षा केंद्रासाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

१. प्रणालीमधील प्रश्नपत्रिका फोटोकॉपी हिशोब रजिस्टर (**Register**).
२. उत्तरपत्रिका तपशील रजिस्टर

सर्व मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नीत महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था यांना विनंती की, वरील नमूद केल्यानुसार दोन्हीही नोंद वह्या विद्यापीठाच्या अहिल्यानगर व नाशिक येथील उपकेंद्रावरून तसेच, पुणे जिल्ह्यातील महाविद्यालयांनी विद्यापीठाच्या गोदाम कक्षातून समक्ष उपलब्ध करून घ्याव्यात व नोंदवहीमधील रकान्यात नमूद केल्यानुसार माहिती संबंधितांच्या स्वाक्षरीसह अद्ययावत ठेवावी, ही विनंती.

कळावे.

आपला,

संचालक
(परीक्षा व मूल्यमापन मंडळ)